# अभिरुची

**मराठी मंडळ सॅक्रामेंटोचे त्रैमासिक मुखपत्र**



# गणेशोत्सव विशेषांक

- प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलांचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक व मंडळाकडे राहतील.

# २०१७ अंक # २

## या अंकात


| | |
|---|---|
| संपादकीय | मीनल जोशी |
| कार्यकारिणीचे मनोगत | प्राची जेजुरीकर |
| श्री गणेश रेखाचित्र | अमेय धुमाळ |
| श्री गणेश रेखाचित्र | चित्रा बापट |
| निसर्गाचे वाण आणि त्याची जपणूक | स्मिता कुलकर्णी |
| आंबा मलई पेढे/मोदक | रेणू रानडे |
| कणकेचे मोदक तळणीचे/उकडीचे | निलांबरी पोवार |
| भरली राजेळी केळी | अजिता निमकर |
| गारेगार आईसक्रीम मोदक | शिल्पा जैन |
| शास्त्रोक्त अष्टविनायक दर्शन | सोनाली भिसे |
| आमच्या घरचा गणपती | मंडळातील सदस्य |
| आमचा गणपती- सॅक्रामेंटो स्टेट युनिव्हर्सिटी | कौस्तुभ उपाध्ये |
| संतांची महती - श्री समर्थ रामदास स्वामी | कुमार कुलकर्णी |
| Maharaja Shivaji | अजित नातू |
| मराठी शाळा अहवाल | विक्रम बोबडे,पल्लवी सावंत |
| आगामी कार्यक्रमां ची सूची | कार्यकारिणी |
| मागील कार्यक्रमांची प्रकाशचित्रे | कार्यकारिणी |

## संपादकीय

**गणपती बाप्पा मोरया|मंगलमूर्ती मोरया||**

**एक दोन तीन चार| गणपतीचा जयजयकार||**

नमस्कार मंडळी ,

लवकरच या गजरात घरोघरी श्री गणेशाचे आगमन होणार आहे. मनुष्यप्राणी हा समाजप्रिय आहे. आणि जिथे समाज एकत्र येतो तिथे उत्सव देखील आलेच. आपण वर्षभरात अनेक सण, उत्सव सतत साजरे करीत असतो. अनेक देव देवतांची आराधना करतो, ती आपली श्रद्धाथाने आहेत पण तरीही अगदी लहानांपासून थोरांपर्यंत सगळ्यांच्याच मनात मानाचे आणि प्रेमाचे खास स्थान मिळवलेलं आहे ते या गणपती बाप्पाने! आणि मग असा हा सगळ्यांचा लाडका खास जिव्हाळ्याचा पाहुणा घरी येणार म्हटल्यावर त्याचे स्वागत हे धूमधडाक्यात आणि जल्लोषातच झाले पाहिजे.

हा बाप्पा फक्त घरांतच विराजमान होतो असं नाही तर जिथे जिथे चार मराठी माणसे एकत्र येतात तिथे प्रत्येक ठिकाणी त्याची स्थापना होते आणि उत्सवी वातावरण तयार होते. मूर्ती, सजावट, नैवेद्य, मित्रंडळींना आरती आणि दर्शनासाठी धाडावयाची आमंत्रणं अश्या एक ना अनेक गोष्टींची तुमची सुद्धा नक्कीच लगबग सुरू असेल. म्हणूनच आम्ही यावेळचा आपला "अभिरुची"चा अंक खास "गणपती विशेषांक" काढायचे ठरवले. या विशेषांकासाठी आपल्या मंडळातील अनेक सदस्यांनी अगदी भरभरून प्रतिसाद दिला त्याबद्दल मी सर्वप्रथम त्यांचे सगळ्यांचे खास आभार मानते.

कार्यकारिणीचे मनोगत मांडले आहे मंडळाच्या सचिव प्राची जेजुरीकर यांनी.

विशेषांकाच्या सुरुवातीलाच तुम्हाला बघायला मिळेल आपल्या मंडळातील अतिशय गुणी आणि उगवत्या चित्रकाराने अमेय धुमाळने रेखाटलेलं त्याच्या आवडत्या गणपती बाप्पाचे चित्र. त्याचबरोबर आपल्या मंडळातील एक उत्तम कलाकार चित्रा बापट यांनी देखील श्री गणेशाचे अतिशय सुंदर चित्र रेखाटले आहे.

उत्सव साजरा करताना सामाजिक तसेच पर्यावरणाचे भान ठेवणे देखील आवश्यक आहे. आजकाल अनेक ठिकाणी सण साजरे करताना निरनिराळ्या प्रकाराने होणारे प्रदुषण, पर्यावरणाची, निसर्गाची नासधूस याकडे काहीवेळेस कानाडोळा केला जातो. तसे न करता पर्यावरणाचा, निसर्गाचा समतोल साधत रूढी आणि परंपरांचे अंधपणे पालन न करता काळाप्रमाणे बदलत डोळसपणे विचार करून आपण उत्सव कसा साजरा करू शकतो, ते आपल्या लेखातून सांगतायेत स्मिता कुलकर्णी.

कुठलाही उत्सव हा या एका गोष्टीशिवाय पूर्ण होऊच शकत नाही आणि ती गोष्ट म्हणजे निरनिराळ्या खाद्यपदार्थांची रेलचेल. आणि गणेशोत्सव हा तर त्यातून आणखी खास उत्सव! श्री गणरायाच्या आगमनाची इतर जोरदार तयारी जशी चालू असते तशीच तो आपल्या घरी आल्यानंतर त्याच्या आवडीचे पदार्थ करून त्याला कसे खूश करता येईल याची पण जय्यत आखणी असते. अश्याच काही गणपतीच्या आवडीच्या पदार्थांच्या पाककृती तुमच्यासाठी दिल्या आहेत आपल्या मंडळातील रेणू रानडे, निलांबरी पोवार, अजिता निमकर व शिल्पा जैन या सुगरणींनी त्यांच्या खास टीपांसकट!

सोनाली भिसे आपल्या सगळ्यांना घेऊन जाणार आहेत अष्टविनायकाच्या दर्शनाला! पश्चिम महाराष्ट्र व कोकणांत असलेल्या या आठ देवळांना विशेष महत्त्व आहे. आठ गणपतीच्या देवळांचा संच म्हणजे अष्टविनायक! यातील अनेक देवळे ही पेशवेकालीन आहेत. प्रत्येक देवळाची माहिती व तेथील गणपतीची कथा या लेखातून जाणून घेऊया.

निर्गुण निराकार असा हा श्रीगजानन जेव्हा घरोघरी विराजमान होतो तेव्हा त्याची कितीतरी साजिरी गोजिरी रुपे बघावयास मिळतात. प्रत्येक घरी त्याची सजावट वेगळी, त्याचा थाट वेगळा. दरवर्षी सजावट करताना "जर्रास वेगळं" करण्याचा प्रयत्न, निरनिराळ्या कल्पना यामुळे घरोघरी हा गणपती वेगवेगळ्या सुंदर मोहक रुपांमधून दर्शन देत असतो. आपल्या मंडळातील काही जणांच्या घरच्या गणपतीच्या दर्शनाचा लाभ तुम्हाला "आमच्या घरचा गणपती" या सदरातून नक्कीच घेता येईल.

काही वर्षांपूर्वी स्वतःच्या छोट्याश्या अपार्टमेंटमध्ये सॅक्रामेंटो स्टेट युनिव्हर्सिटीमध्ये शिकणाऱ्या तीन मराठी विद्यार्थ्यांनी सुरु केलेल्या गणेशोत्सवाच्या बदलत्या स्वरुपाबद्दल अभिमानाने सांगताहेत श्री. कौस्तुभ उपाध्ये.

याचबरोबर संतांची महती या सदरात श्री. कुमार कुलकर्णी काका यावेळेस आपल्याला सांगणार आहेत श्री समर्थ रामदास स्वामी यांच्याबद्दल.

श्री. अजित नातू यावेळेस आपल्याला शिवरायांच्या स्वराज्य उभारणीची माहिती देत आहेत.


आपल्या मराठी शाळेच्या यंदाच्या शालेय वर्षाची नुकतीच सुरुवात झाली आहे. शाळेचा वृत्तांत दिला आहे श्री. विक्रम बोबडे व पल्लवी सावंत यांनी.

त्याचप्रमाणे या अंकात आहे मंडळाच्या वर्षभराच्या कार्यक्रमांची सूची व मागील काही कार्यक्रमांच्या प्रकाशचित्रांचे दुवे!

असा हा विशेषांक तुम्हाला कसा वाटला हे आमच्यापर्यंत नक्की पोचवा! तुम्हाला अंकात काही बदल, सुधारणा कराव्याशा वाटत असतील, काही सुचवण्या असतील तर जरूर कळवा. त्याचप्रमाणे तुम्हाला जर अंकात काही लेख, साहित्य, प्रकाशचित्रे, पाककृती द्यायची असतील तर आम्हाला नक्की पाठवा. संपर्कासाठी ईमेल पत्ता आहे: committee@mmsac.org

जाता जाता , या अंकासाठी साहित्य पाठवलेल्या सगळ्यांचे मनापासून आभार! त्याचप्रमाणे श्री. कुमार कुलकर्णी काकांनी लेखांच्या मुद्रितशोधनासाठी मदत केल्याबद्दल त्यांना अनेक धन्यवाद!

गणेशोत्सवाच्या आपणां सर्वांना अनेक हार्दिक शुभेच्छा! आपणा सर्वांना सुखसमृद्धी, आनंदी, निरोगी व निरामय दीर्घायुष्य लाभो हीच श्री गजाननच्या चरणी प्रार्थना!



**वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ|**

**निर्विघ्नं कुरुमे देव सर्वकार्येषु सर्वदा||**

आपली स्नेहांकित

**मीनल जोशी**



**(संपादक, अभिरुची त्रैमासिक, mmsac)**

**Meenalj29@gmail.com**

# कार्यकारिणीचे मनोगत

नमस्कार मंडळी,

आम्हाला खात्री आहे की हा गणेशोत्सव विशेषांक तुम्हाला नक्कीच आवडेल! ह्या वर्षीचे सर्व अंक हे विशेषांक म्हणून काढण्याचा मीनल जोशी हिचा बेत पूर्ण करण्यासाठी तिने स्वतः खूपच मेहनत घेतली आहे. तिचे तसेच ह्या अंकासाठी लेख /कविता देणाऱ्या सगळ्यांचे मनापासून आभार!

ह्या वर्षी समितीने नेहेमीच्या ( रंगपंचमी, सहल) कार्यक्रमांबरोबरच इतरही विविध प्रकारचे मोजके परंतु दर्जेदार कार्यक्रम ( उदा. नाटक 'तीन पायांची शर्यत', सलील कुलकर्णींच्या बरोबर बहरलेली मैफिल 'माझे जगणे होते गाणे' आणि मराठी चित्रपट 'मुरांबा') देण्याचा प्रयत्न केला आहे. ह्यावर्षी प्रथमच नाटकाचे संपूर्ण नेपथ्य हे आपल्या कार्यकर्त्यांनी इथेच श्री. उमेश जाधव आणि श्री. संदीप बिडये ह्याच्या मार्गदर्शनाखाली केले. अनेक कार्यकर्त्यांनी पूर्णपणे झोकून देऊन काम केल्यामुळेच हे सर्व शक्य झाले.

नुकतेच आपले camping उत्तमरीत्या पार पडले आहे. आपल्या अनुभवी camping lead सौ. पल्लवी सावंत यांनी इतर सहकार्यांना बरोबर घेऊन ह्याचे उत्तमपणे आयोजन केले. जमलेल्या सगळ्यांनीच अतिशय धमाल केली. तिथेच आपले सुप्रसिद्ध 'सोनू ' चे गाणे चित्रित करण्यात आले. हा एक अतिशय सुंदर आणि वेगळा अनुभव होता. ह्या गाण्याचे संकल्पन, लेखन आणि चित्रीकरण विक्रांत सावंत ह्यांचे होते. हे गाणे तुम्ही MMSAC च्या facebook page वर बघू शकता.

ह्या आठवड्यातच आपला 'गणेशोत्सव २०१७ ' रविवार ऑगस्ट २७ ला साजरा होणार आहे. ह्यासाठीही आपण सर्वांनी झटपट RSVP करून बहार आणली आहे. ह्यापुढेही प्रत्येक कार्यक्रम जाहीर झाल्यावर झटपट RSVP( /tickets) करून तुम्ही सर्वांनी आम्हाला अशीच मदत करावी ही विनंती. ह्या गणेशोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये भाग घेण्यासाठी लहान मुला-मुलींनी दांडगा उत्साह दाखवला आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच!

त्यापुढेही आपले 'कोजागिरी', 'दिवाळी' आणि 'संक्रांत/AGM' असे कार्यक्रम आहेतच. तेव्हा ह्या सर्व कार्यक्रमांना जोरदार प्रतिसाद द्यावा अशी आपल्या सगळ्यांना नम्र विनंती!

मंडळाच्या  कार्यक्रमात तुम्हाला 'स्वयंसेवक' म्हणून काम करायचे असल्यास आम्हाला जरूर कळवा. तुमच्यासारख्या कार्यकर्त्यांशिवाय  मंडळाचा कोणताच कार्यक्रम होणे शक्य नाही!

कळावे,

सौ. प्राची जेजुरीकर


Century 21
SELECT REAL ESTATE
6300 Florin Rd
Sacramento, CA 95823
Office: 916-394-8705
Direct: 916-695-7703
eFax: 916-394-8805
lpokle@c21selectgroup.com
laxmikant.pokle.c21selectgroup.com
Laxmikant Pokle
Realtor®
CaBRE #01986685
Each office is independently owned and operated
MLS



•||mithai4all||•
www.mithai4all.com
गणपती बाप्पा मोरया
*Conditions Apply
Modak Festival
Send Modaks to your Parents, Brothers, Sisters, Friends & Relatives in India, USA, UK, Canada, Singapore & Dubai
Keshar Modak | Mango Modak | Pista Modak
Dryfruit Modak | Kaju Modak | Chocolate Modak
from Chitale Bandhu, Pune | Kaka Halwai, Pune
Bhavnagari, Pune | Ghodake Mithaiwale, Pune
Panshikar Sweets, Mumbai
SPECIAL DISCOUNT OFFER FOR MMSAC MEMBERS
APPLY DISCOUNT VOUCHER CODE GANESHA10 &
GET 10% DISCOUNT* ON ORDERS ABOVE Rs. 1000
Share this SWEET OFFER @ whatsapp/social media
Order online @ www.mithai4all.com
Home delivery across India & Worldwide*


mithai4all
Your Shop Away From Home
Celebrate Diwali with Mithai4all
Send mithai gifts to your
parents, friends & relatives in India.
Order mithai online & get it home delivered
We also deliver to US, UK, Canada,
Singapore, Australia and 10+ countries

# ||गणपती बाप्पा मोरया||



**चित्रकार:** अमेय धुमाळ

# || ॐ गं गणपतये नमः ||



**चित्रकार : चित्रा बापट**

## निसर्गाचे वाण आणि त्याची जपणूक

कॅलिफोर्नियातील ५० महामार्गावर असलेल्या सिएरा निवाडा डोंगरांच्या रांगांपैकी एकाच्या कुशीत दडलेले ते छोटेसे , टुमदार आणि सुंदर घर! घराच्या परिसरातूनच खळखळ वाहणारी अमेरिकन नदी, तिच्या भोवताली युगेयुगे उभे असलेले पाईन आणि सायप्रसचे उंच, डेरेदार वृक्ष! निसर्गात तासन् तास रमणारी मी, अक्षरशः मंत्रमुग्ध झाले होते तो नजारा पाहून! अगदी परिकथेत वाचल्यासारखेच घर होते ते! असं स्वप्नवत घर असू शकतं? तल्लीन होऊन नदीचे, वृक्षांचे, डोंगरांचे फोटो घेऊ लागले. घराभोवतीचा प्रशस्त, ऐसपैस बांधलेला लाकडी चौथरा घर बांधणार्याच्या निसर्गप्रेमाची ओळख करून देत होता. त्या सुंदर नजाऱ्याने मोहित झालेली मी पूर्णपणे स्वप्नात हरवले. सकाळचा पहिला वाफाळलेला चहा घेऊन या चौथऱ्यावर बसावं आणि नदीचे लयबद्ध गाणे ऐकावे, किंवा गरम गरम कांदापोह्यांचा नाश्ता खाताखाता त्या निसर्गात बागडणाऱ्या विविध पक्षांचा नाच बघावा, त्यांची सुमधुर किलबिल ऐकावी आणि रात्रीचे जेवण या चौथऱ्यावर बसून करायला काय मस्त वाटेल, मंद वाऱ्याची झुळूक अनुभवत आणि लुकलुकणाऱ्या चांदण्यांनी नटलेले आकाश न्याहाळत! माझी स्वप्नमाला तेव्हां थांबली जेव्हां माझ्या नवऱ्याने मला हलवलं, "चल निघूया, आपल्याला दिवसा एकदा येऊन हे घर नीट पाहायला हवं, मी आपल्या रिअल इस्टेट एजंटला सांगतो अपॉइंटमेंट घ्यायला पुढच्या वीकेंडची". मी नुसते हो म्हणाले आणि गाडीच्या दिशेने यंत्रवत पाऊले टाकू लागले.



निसर्गाच्या विविध रंगानी आणि पैलूंनी  नखशिखांत नटलेलं ते घर माझ्या मनात एकदम घर करून राहिलं. लेक टाहोच्या किंचित पश्चिमेला असलेल्या आणि टाहो व एल डोरॅडो नॅशनल फॉरेस्ट मध्ये येणाऱ्या सिएरा निवाडा डोंगरांच्या हिमाच्छादित शिखरामधून उगम पावलेली ती अहर्निश वाहणारी अमेरिकन नदी, मला हिमालयातून उगम पावलेल्या गंगेसारखी वाटू लागली. घरी परत आल्यानंतर खिडकीतून दिसणारं फॉलसम तळं पाहताना त्या नदीची सारखी आठवण येऊ लागली. ती सतत वाहणारी सदानीराच या तळ्यात पाणी घेऊन येते आणि फॉलसमवासियांच्या पाण्याची सोय करते. निसर्गाकडे जेव्हा आपण जागरुकतेने बघतो तेव्हा आपल्याला आपलं आणि त्याचं परस्परावलंबित्व लक्षात येऊ लागतं आणि मग त्यातून मिळणारी प्रेरणा आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा घटक बनून जाते. माझ्या निसर्गप्रेमी मनाने तेवढ्यात टिपलेल्या लहान लहान गोष्टी माझ्या डोळ्यांसमोर सतत दिसू लागल्या. महामार्गावरून घराकडे येणारी नागमोडी वाट, त्याच्या दोन्ही बाजूला उभ्या असलेल्या उंच पाईन व सायप्रसच्या सदाहरित वृक्षांच्या फांद्यांनी त्या वाटेवर कमानीसारखी केलेली महिरप, घराच्या भोवतीचे विशाल आवार, आवारात लावलेली फुले आणि नैसर्गिकपणे फुललेली विविध रंगांची सुंदर  रानफुले, त्यांच्या भोवतीचे पांढरे लाकडी कुंपण, गुलाबाचे वेल असलेल्या दोन सुंदर कमानी, नदीकिनाऱ्यावर बांधलेला, उबदार आणि घरेलूपणाची जाणीव करून देणारा डौलदार गझीबो आणि सगळ्या आवारात विखुरलेले अगणित पाईनकोन्स!  पुढचे कितीतरी आठवडे मी त्या निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या छोट्या घरकुलात मनानेच राहत होते आणि एक दिवस असा आला की त्या थोर विध्यात्याच्या कृपेमुळे माझे स्वप्न प्रत्यक्षात आले.

आम्ही प्रथम घरात राहायला आलो ते शरद ऋतूचे दिवस होते. हवेत किंचित गारवा आला होता. शरद ऋतुने आणलेल्या लाल, पिवळ्या आणि तपकिरी, रंगाची लेणी ल्यायलेल्या झाडांची सुंदरता मला सुखावून गेली. एखादी शाल पांघरून सकाळच्या चहाचा आस्वाद नदीचे गाणे ऐकत ऐकत घ्यायचे  स्वप्न मनसोक्त पुरे झाले.  शरदात काही झाडांचे अपुऱ्या पाण्यामुळे आणि अपुऱ्या सूर्यप्रकाशामुळे प्रकाशसंश्लेषण थांबते. त्यामुळे पानांमधील क्लोरोफील हळूहळू कमी होऊन हिरवा रंग फिकट होऊ लागतो आणि त्यामुळे पानांमध्ये प्रकर्षाने पिवळा, तपकिरी, नारिंगी असे रंग उठून दिसू लागतात. मेपलच्या झाडांमध्ये प्रकाशसंश्लेषण थांबल्यामुळे पानांमध्ये ग्लुकोज अडकून राहते आणि हेमंत ऋतूच्या रात्रीच्या गार हवेमुळे आणि दिवसाच्या सूर्यप्रकाशामुळे तिचा रंग लाल होऊन पाने सुरेख तांबडी लाल दिसू लागतात. निसर्गाच्या या बदलाकडे बघून असं वाटतं की माणसालाही काहीतरी नवीन, धाडसी आणि वैशिष्ठ्यपूर्ण करायची संधी अगदी सहज उपलब्ध असताना तो त्याच जुन्या, ठराविक नियमाप्रमाणे जीवन जगत राहतो.  हळूहळू

बऱ्याच झाडांनी आपली पाने गाळायला सुरुवात केली. थंडीत मस्तपैकी लांबलचक झोप काढण्याच्या जणू ते तयारीला लागले.






शिशिराची चाहूल पहिल्या हिमवर्षावाने जाणवून दिली. प्रत्यक्ष होणारा हिमवर्षाव पाहण्याची मजा काही न्यारीच. कितीतरी वेळा खिडकीत बसून बाहेर होणारा हिमवर्षाव बघण्याचे भाग्य मला मिळाले. रात्री अगदी शांतपणे पडणारा बर्फ, सकाळी उठून बघतो तेव्हा चमचमणारा पांढरा शुभ्र गालिचा बनून तुमचे स्वागत करतो. सगळ्या सृष्टीने जणू काही स्वच्छ, सफेद उबदार पांघरूण पांघरलेले असते. खरंच काय जादू असते एका हिमकणात, बघता बघता तो सारी सृष्टी सुंदर करतो! निसर्गाची ही किमया बघून माझे डोळे अक्षरशः दिपून जायचे. अशा बर्फाच्छादित जमिनीवर चालायची मजा काही आगळीच आहे. पण स्नोबुटांशिवाय गत्यंतर नाही. स्नोजॅकेट, स्नोबूट्स, हातमोजे, मफलर आणि कानटोपी घातली की तुम्ही बर्फाचा आनंद लुटायला तयार होता. मग बर्फाचे गोळे फेकणे, स्नोस्लेडिंग करणे इत्यादी खेळण्याचा आनंद मिळू शकतो. आमची चार वर्षाची लॅब्राडोर; रेवा, बर्फात खेळण्याची मजा मनसोक्त उपभोगते. तिचा निरागस आनंद बघून मलाही बर्फात खेळावंसं वाटतं. मनसोक्त खेळून झाल्यावर गरम गरम कॉफी वा हॉट चॉकोलेटचा आस्वाद घेत निसर्गाच्या सानिध्यात घालवणे म्हणजे एक पर्वणीच! बर्फाच्छादित चौथऱ्यावर उभे राहून नदीचे

हिमवृष्टीनी नटलेले सौंदर्य पाहणे हा माझा आवडता छंदच झाला होता. तर कधी कधी एखादं पुस्तक घेऊन बर्फाची सुंदरता खिडकीत बसून ते वाचता वाचता मी अजमावयाचे.

जास्त बर्फ पडल्यावर होणारी गैरसोयही अनुभवली. २ ते ३ फूट बर्फ पडल्यावर तो बाजूला करून गाडीसाठी रस्ता साफ करणे ही नवशिक्यांसाठी अगदी जिकिरीची गोष्ट. तो खास बर्फासाठी बनवलेल्या फावड्याने बाजूला करायचा. साफ केला नाही तर तुम्ही बाहेरच पडू शकत नाही. अशा वेळेला घरात पुरेशा खाण्याच्या गोष्टी नसल्या की मग होते मोठी पंचाईत आणि त्यात तुमच्याबरोबर २ मोठे लॅब्राडोअर्स (राजा आणि रेवा) असले की अणिकच अवघड! पहिल्या एक-दोन अनुभवानंतर भरपूर कोरडा किराणा माल; डाळी, तांदूळ, पोहे, रवा, मसाले, इत्यादी आणि पिण्याचे पाणी साठवायला सुरुवात केली. कधी कधी झालेल्या हिमवादळामुळे दोन दोन तीन तीन  दिवस वीज जाण्याचाही अनुभव मिळाला. गाडीची चाकेही बऱ्याचदा अडकून बसल्याचा अनुभव आला. मग मात्र आम्ही एक स्नोब्लोअर विकत घेतला. खास बर्फ वितळण्यासाठी बनवलेलं खडे मीठ टाकून रस्ता साफ करायला शिकलो. खडे मिठाने बर्फ लवकर वितळतो त्यामुळे रस्ता लवकर साफ होतो. अनेकदा गोठलेल्या बर्फावरून घसरून पडणे झाले. थंडीत दिवसाही तपमान इतके थंड असते की बर्फ कित्येक दिवस वितळत नाही. तो जेव्हा काँक्रिट किंवा विटांच्या पृष्ठभागावर राहतो तेव्हा तो जाम गोठून बसतो आणि निसरडा बनतो. मग काय, सटासट आपटायला होते! बर्फासंबंधित अशा निरनिराळ्या चित्तथरारक अनुभवांची एक वेगळीच मजा अनुभवायला मिळाली. एवढे सगळे श्रम केल्यानंतर संध्यकाळच्या जेवणात मऊ मऊ मुगाच्या डाळीची खिचडी आणि टोमॅटोचे सार ओरपताना अगदी कृतकृत्य वाटायचं. राजा आणि रेवाही त्यांचे डॉगफूड अगदी चवीने खायचे आणि त्यांच्या झोपण्याच्या उशांवर झकास ताणून द्यायचे. अशावेळी बॅकग्राऊंड मध्ये किशोर कुमारचे "खिलते है गुल यहाँ" ऐकत ऐकत फायरप्लेस समोर धरून गोरठलेले हात शेकून घेण्याची मजा मग सारे कष्ट विसरायला लावायची.



हळूहळू बर्फ वितळू लागून वसंत ऋतू स्वतःची चाहूल देऊ लागला. झाडांना फुटलेली कोवळी पालवी पाहून मन आनंदित झाले. थंडीत झोपलेली सृष्टी जणू हळू हळू जागी होऊ लागली. घराच्या परिसरात असलेले डॅफोडिल्स चे कांदे जमिनीतून वर येऊ लागले. पिवळ्या तजेलदार डॅफोडिल्सच्या फुलांनी बाग बहरू लागली. हळूहळू आयरीसचे कांदेही उमलू लागले. पांढऱ्या, जांभळ्या, निळ्या आयरिसेसच्या टप्पोऱ्या फुलांनी बागेला आणिकच सुंदरता आणली. विविध रंगी पक्षांची घरटी बांधण्यासाठी लगबग सुरु झाली. घराच्या वरच्या मजल्याच्या खिडकीच्या बाहेर एका काळ्या-करड्या रंगाच्या आणि लांब शेपटीच्या पक्षिणीने तिचं घरकुल केलं होतं. रोजचे तिचे घर बांधण्याचे कष्ट मला बरंच काही शिकवून जायचे. प्रत्येक खेपेला तिच्या तोंडात आपलं घरकुल सजवण्यासाठी विचारपूर्वक निवडलेली काटकी वा धागा असायचा. पुढे ग्रीष्माची सुरुवात होताच दोन इवलीशी डोकी व उघडलेल्या चोची दिसू लागल्या. आई आणि वडील दोघेही आपल्या बाळांची काळजी घेण्यात पूर्णपणे रममाण झालेले आढळून आले. आपल्या इवल्या जीवांची भूक भागवताना त्यांची तारांबळ होऊ लागली. लाल, गुलाबी, पांढरे गुलाब फुलू लागले. पांढऱ्या आणि पिवळ्या शेवंतीची फुले उमलू लागली. विविध फुलांबरोबर अनेक प्रकारच्या तृणांचेही जोमाने पीक आले. विविधरंगी रानफुले आणि त्यावर मुक्तपणे बागडणारी फुलपाखरे, मधमाश्या, भुंगे, आणि अनेक सारे वेगवेगळे कीटक बघण्यात माझी सकाळ कुठल्या कुठे निघून जायची! सकाळी घराच्या आवारात चालणे, रेवाला चेंडू टाकणे, आणि निसर्गदेवतेने उदार हस्ताने दिलेल्या या वाणाचे मनसोक्त फोटो काढणे यात सकाळ संपून जायची. निसर्ग किती निःस्वार्थी असतो ना? काही म्हणजे काही राखून न ठेवता अगदी सर्वस्व अर्पण करतो तो! घेणाऱ्याचीच मर्यादा राहते! तो हे निसर्गाचे सौंदर्य घेऊ शकतो ते फक्त त्याच्या डोळ्याचे पारणे फिटेपर्यंत!




कधी एखाद्या दिवशी सकाळी पाईनच्या वृक्षांनी मुक्तहस्ताने अर्पण केलेले अगणित पाईनकोन्स मी वेचत राहायचे. न जाणो का पण पाईनकोन्सचे मला खूपच आकर्षण आहे. पाईनकोनबद्दल मी वाचले तेव्हा मला कळले की त्याचा इतिहास आणि प्रतीकवाद काय आहे. पाईनकोन हा अध्यात्मिक ज्ञानाचा प्रतीक मानला जातो. नैसर्गिक भूमिती शास्त्रानुसार त्याच्या स्पाइन्सची आवर्तने कोणत्याही एका दिशेत ठोस आणि परिपूर्ण फिबोनॅची क्रमाप्रमाणे दिसतात जी आपण गुलाब किंवा सुर्यफुलात पाहतो. मनुष्याच्या मेंदूतील पिनिअल ग्रंथीचा आकार पाईनकोनसारखा असल्यामुळे तिला पिनिअल ग्रंथी म्हणतात. ती आपल्या मेंदूच्या भौमितिक केंद्रात असते आणि आपले प्रकाशाचे ज्ञान व आपल्या शरीराचे वेळापत्रक सांभाळते आणि म्हणूनच तिला आत्मज्ञानाचे उपरिकेंद्र समजतात. तिला आपला तिसरा डोळाही समजले जाते. हे वाचल्यावर पाईनच्या वृक्षांबद्दल मला अजूनच आदर वाटू लागला. कितीतरी उंच व वर्षानुवर्षे उभ्या असलेल्या पाईनच्या वृक्षांनी नटलेले ते आवार मला निसर्गाच्या अध्यात्मिकतेचे प्रतीक वाटू लागले. अमेरिकेत होऊन गेलेला सर्वात प्रभावशाली निसर्गवादी; जॉन मुईर म्हणतो, " प्रत्येकी दोन पाईनच्या वृक्षामागे एका नव्या जगाचा मार्ग आहे". मला ते खरोखरीच पटले.  इथे आल्यापासून मला केवढा जवळून निसर्ग पाहता आला! मी केवढी जागरूक झाले!




हे असे निसर्गाचे ऋतुचक्र चालू असताना घराच्या अंगणातून वाहणारी ती गंगा नदी आपले संतत वाहण्याचे काम करतेच आहे.  तिच्या प्रवाहाचा जोर, पडलेल्या पावसावर आणि हिमवृष्टीवर अवलंबून असल्यामुळे

कमी-जास्त होतो, पण आपले पाणी साठवून ठेवावे हे तिच्या स्वभावाला यत्किंचितही शिवत नाही. पाण्यासारखी अत्यावश्यक गोष्ट ती अनंतहस्ते विनामूल्य पुरवत राहते. तिचा जन्मच तर या पृथ्वीवरच्या सर्व प्राणिमात्रांच्या हितासाठी झाला आहे! या प्राणिमात्रांसाठी ती सदैव सर्व प्रकारचे कष्ट सहन करायला तयार असते. तिची वेगवती धारा रोखून मनुष्याने बांधलेले बांधसुद्धा ती या एकच कारणासाठी सहन करते. तिच्या काठावरच तर मानव संस्कृतीचा जन्म आणि भरभराट झाली आहे. तिला वाटत नसेल की तिचे पाणी स्वछ आणि शुद्ध राहावे? ज्या पाण्याचा सर्व प्राणिमात्रांना उपयोग होतो ते पाणी गढूळ, अशुद्ध होऊन कसे चालेल? पण मनुष्य हे का समजू शकत नाही? निसार्गासारखा निःस्वार्थी का होऊ शकत नाही? आपल्याला विनामूल्य मिळालेली नैसर्गिक संसाधने तो इतक्या अज्ञानपणे का हाताळतो? का आपल्या नद्या आणि नाले अशुद्ध करतो? पृथ्वीमातेने उदारहस्ते मोफत दिलेल्या सर्व नैसर्गिक संपत्तीकडे आपण डोळस कृतज्ञतेची भावना ठेवणे जरुरी नव्हे का? ही संपत्ती आपल्या पुढच्या अनेक पिढयांना पुरावी हा तरी विचार ठेवायला हवा! ही साधी सरळ संस्कृती आहे. निष्काळजी आणि बेपर्वाई हे असंस्कृत आचारांचे प्रतीक नव्हे का? आपल्या या निसर्गाची संपत्ती आणि सुंदरता टिकून राहावी म्हणून आपापल्या परिने करण्यासारखं काय करू शकतो आपण? पहिल्यांदा आपली संवेदनशक्ती जागृत होणे आवश्यक आहे. संकुचित वृत्ती आणि स्वार्थ सोडून स्वतंत्रपणे विचार करायला सुरुवात करायला हवी. अशाने आपण जागे होऊ लागतो, डोळस बनू लागतो, संवेदनशील बनू लागतो. सतराव्या शतकात जन्मलेल्या संत तुकारामांनी सुद्धा निसर्गाचे आणि मनुष्याचे परस्परावलंबित्व जाणले होते. त्यांनी लिहीलेला लोकप्रिय अभंग, 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' आचरणात आणण्याचा प्रयत्न कसा करायचा?





सर्वात प्रथम जागतिक तापमानवाढ कश्यामुळे होते आहे ते कार्बन फुटप्रिंट म्हणजे काय हे जाणून घेणे महत्वाचे आहे. मनुष्याच्या अनेक निरनिराळ्या गरजा पूर्ण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या साधनांना

लागणाऱ्या ऊर्जेमुळे पर्यावरणात पसरणारा हरितगृही वायू म्हणजे कार्बन डाय ऑकसाइडचे टनामध्ये मोजले जाणारे प्रमाण. सर्व प्रकारची इंधने; पेट्रोल, डिझेल, गॅस, तेल, कोळसा इत्यादी वातावरणात कार्बन डाय ऑकसाइडचे प्रमाण वाढवण्यात भर घालतात. त्यामुळे हवा दूषित होऊन प्राणिमात्रांना हानिकारक होते. हे सर्व कळल्यावर मी एकटी काय करू शकणार आहे हे बदलण्यासाठी? हा विचार आला की 'थेंबे थेंबे तळे साचे' ही म्हण लक्षात ठेवावी. हात झटकून परत 'येरे माझ्या मागल्या' करू नये. डोळसपणे टाकलेले प्रत्येक पाऊल बदल घडवून आणण्यात महत्वाचे ठरते. आपल्या रोजच्या व्यवहारासाठी काय जरुरी नाही आहे किंवा आज मी एखादी गोष्ट कशी वेगळ्याप्रकारे करू शकेन जेणेकी पर्यावरणातले माझ्याकडून होणारे वायू प्रदूषण कमी होईल हे विचारपूर्वक लक्षात घ्यावे.  बाटलीबंद पाणी खरेदी करण्याऐवजी नळाचे पाणी, पाण्याच्या बाटलीत भरून ठेवून तीच बाटली धुवून पुन्हा पुन्हा वापरावी. कागदी प्रोडक्टस वापरताना शक्यतो ते बायोडिग्रेडेबल असावेत. प्लास्टिक व थर्माकोल वापरू नये. थर्मोकोल हे जमिनीमधल्या जिवाणूंसाठी अतिशय धोकादायक आहे. थर्मोकोलमुळे जिवाणूंची कुजण्याची क्रिया अतिशय हळू होऊन जमीन नापीक बनते.  थर्मोकोलच्या जाळण्यामुळे तयार होणारे वायू श्वासाद्वारे फुफ्फुसात गेल्यास तब्येतीला अत्यंत हानिकारक असतात. प्लॅस्टिकचे विघटन होत नसल्याने ते शक्यतो कमी प्रमाणात वापरावे व रिसायकल करावे. प्लॅस्टिक आणि काचेच्या बाटल्या व डबे टाकून देण्यापेक्षा ते वापरून नाना तर्हेचे शोपिसेस करता येतात. ते स्वछ धुऊन साठवणीसाठीही त्यांचा चांगला वापर होऊ शकतो. वापरात नसलेला कम्प्युटर, मोबाईल फोन, विजेवर चालणारी साधने अनप्लग करावीत. दिवे, पंखे नको तेव्हा बंद ठेवावेत. विजेवर चालणारी साधने व घरात वापरात असलेले सर्व लाईट बल्ब्स ऊर्जाकार्यक्षम असावेत. घर स्वच्छतेसाठी लागणारी साफसफाईची उत्पादने पर्यावरणास अनुकूल असणारी असावीत. टॉयलेट्स मध्ये अधिक कार्यक्षमता असणारे, कमी पाण्याचा वापर होणारे पाण्याचे टँक वापरावेत. डिशवॉशर आणि कपडे धुवायचे मशीन पूर्ण भरल्याशिवाय लावू नये. एखादीच गोष्ट आणण्यासाठी गाडीने बाजाराची खेप करण्याऐवजी जे काही हवे असेल त्याची यादी काढून ठेवावी आणि एकाच खेपेत शक्यतो सर्व कामे उरकावीत. त्यासाठी कारपूलिंग केले तर उत्तमच! कमीतकमी पॅकेजिंग असलेल्या वस्तू वापराव्यात. कागदी पिशव्या पुन्हा पुन्हा वापराव्यात. शक्यतो पुनर्नवीनीकरण केलेली उत्पादने वापरावीत. ती बनवायला इतर उत्पादनांपेक्षा कमी ऊर्जा खर्च होते. खास किफायतशीर शॉवरहेड्स बसवून घेतल्यास अंघोळीतला पाण्याचा वापर कमी होऊ शकतो. शॉवर सोडल्यावर सुरुवातीला गरम पाण्याआधी येणारे गार पाणी नुसते वाहून वाया घालवण्याऐवजी एका बादलीत साठवल्यास ते घरातील अथवा बागेतील झाडांसाठी वापरता येते. घराभोवती झाडे लावावीत. झाडे पर्यावरण पोषक ठेवायला मदत करतात. मी जेव्हां पाणी,

ऊर्जा, आणि अन्न यांचा जाणतेपणाने हवा तितकाच वापर करायला शिकेन तेव्हा त्याचा उपयोग नक्कीच निसर्गातल्या अनेक प्राणिमात्रांना होईल. कितीतरी प्राणिमात्रांना आपण न वापरलेल्या, न खाल्लेल्या आणि पुनर्नवीनीकरणासाठी जमवलेल्या गोष्टींचा उपयोग होतो. आपले विचारपूर्वक पाऊले टाकणे असे त्यांच्या फायद्याचे होते.

आता लवकरच आपला सर्वांचा लाडका गणपतीबाप्पा त्याचा उत्सव साजरा करण्यासाठी घराघरात येतोय. तर त्या गणेशचतुर्थीच्या उत्सवाचा आनंद घेताना आपण काय काय गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात की ज्यामुळे आपला पर्यावरणाच्या प्रदूषणाला हातभार लागणार नाही? तसे केल्यास माझ्या मते बाप्पा खरोखरीच आनंदी होईल. मी स्वतः अनुभवलेले आणि माझ्या वाचनातून शिकलेले मुख्यतः गणेशचतुर्थीच्या वेळी होणारे पर्यावरण दूषित करणारे काही परिणाम खालीलप्रमाणे:

हवा प्रदूषण: अत्याधिक प्रमाणात फोडलेल्या फटाक्यांनी हानिकारक वायूंचे प्रमाण वाढले जाते. सणाच्या कारणाने वाहनांची गर्दी वाढल्यामुळे हवेतील प्रदूषके वाढतात आणि सल्फर डाय ऑकसाइड व कार्बन मोनॉकसाइड या हानिकारक वायूंचे हवेतील प्रमाण वाढते. ती हवा श्वासाद्वारे आपल्याच फुफुसांमध्ये जाऊन त्याचे तब्येतीवर दुष्परिणाम  होतात.

पाणी प्रदूषण: प्लास्टर ऑफ पॅरिसने बनवलेल्या गणेशाच्या मूर्ती शाडूच्या मूर्तींप्रमाणे सहजपणे पाण्यामध्ये विरघळू शकत नाहीत. त्या विरघळायला कित्येक महिने लागतात. मूर्ती रंगवायला वापरलेले रंग वातावरणासाठी हानिकारक असतात. त्यामध्ये असलेले लेड आणि मर्क्युरी पाण्यात मिसळून पाणी दूषित होते आणि प्राणिमात्रांसाठी विषारी बनते. मूर्तींबरोबर थर्माकोल आणि प्लास्टिकच्या बनवलेल्या गोष्टीही पाण्यात टाकण्यात येतात, ज्यामुळे पाण्याचे प्रदूषण अजुनी वाढते.

कचऱ्याची निर्मिती: मूर्तींबरोबर फुले, फळे, उदबत्त्या, कापूर, वस्त्रे, नारळ, आरास करण्यासाठी वापरलेल्या अनेक गोष्टी हे सर्व निर्माल्य स्वरूपात जात असल्यामुळे कचरा वाढतो.

या सर्वांचे दुष्परिणाम समुद्र, नद्या, नाले, यात राहणाऱ्या प्राणिमात्रांवर होऊन त्यांचे जीवन धोकादायक होते. सरकार हे सर्व स्वच्छ करण्यासाठी प्रत्येक वर्षी करोडो रुपये खर्च करते ते वेगळेच. मनुष्याइतकाच इतर सर्व प्राणिमात्रांना या पृथ्वीवर राहायचा हक्क आहे. आपल्या आनंदासाठी आपण त्यांचा आनंद हिरावून घेत नाही आहोत ना? हा विचार नेहमी ठेवायला हवा.

अंधश्रद्धेने धार्मिक रूढी आणि परंपरांचे पालन करताना आपण आपल्या पृथ्वीमातेनी निस्वार्थीपणे आणि विनामूल्य दिलेल्या नैसर्गिक संसाधनांना हानी तर पोहचवत नाही ना ह्याचा डोळस विचार केला पाहिजे. माझ्या मते रूढी आणि परंपरा मनुष्याने आपल्याला हव्या तशा बनवल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक संस्कृतीमध्ये त्या वेगळ्या असतात. त्याची कारणे निरनिराळी असोत पण निसर्ग हा खरा विध्यात्याने बनवला आहे त्यामुळे तो सगळीकडे सारखाच असतो. मग आपण मानवनिर्मित युगेयुगे आपल्या पूर्वजांनी पाळत आणलेल्या काल्पनिक रूढी पाळायच्या की प्रदूषणाने त्रस्त झालेल्या पृथ्वीमातेला मदत करायची?

तर सांगायचा मुद्दा असा की आमच्या घरच्या गणपतीबाप्पाला वाचायची खूप आवड आहे. तो आनंदात मस्त पुस्तक वाचत बसलेला असतो कारण आम्ही त्याचे विसर्जन कधीच करत नाही! आणि त्यामुळे परसातून वाहणारी आमची गंगाही खुशीने वहात असते तिची दिडदा दिडदा सतार वाजवीत! निसर्गाने दिलेल्या या घराच्या वाणामुळे मला खरोखरीच जागरूकता येऊन विश्वात्मकतेची जाणीव झाली. त्याची सुंदरता अनुभवताना त्याची जपणूक कशी करावी याची जाणीव होऊ लागली. आपल्याप्रमाणे आपल्या पुढच्या पिढयांनाही अशी सुंदर सृष्टी बघायला आणि अनुभवायला मिळावी असे वाटल्यामुळे हा लेख लिहावासा वाटला. त्यासाठी मी त्याची कायम ऋणी आहे. त्याला माझे मनापासून शतशः प्रणाम!! दिव्यत्वाची जेथ प्रचिती तेथे कर माझे जुळती!!






स्मिता कुलकर्णी



# आंबा मलई पेढे/ मोदक



**साहित्यः**

२ कप रिकोटा चीज

१ कप स्वीटन्ड कंडेन्स्ड मिल्क

२/३ कप  मँगो पल्प

केशर दुधात खलून घेतलेले.

**कृती:**

एका नॉनस्टिक भांड्यात चीज घालून साधारण १५ मिनिटे मंद आचेवर परतत राहणे. १५ मिनिटांनंतर चीज शिजले की त्यात कंडेंसड मिल्क, मँगो पल्प आणि केशर घालून मिश्रण घट्ट होईपर्यंत ढवळत राहणे. मिश्रण घट्ट व्हायला साधारण ४५ मिनिटे लागतात.

एकदा मिश्रण घट्ट झाले की स्टोव्ह बंद करून आता ते मिश्रण ३० मिनिटे बाजूला ठेवून थंड होऊ द्या. थंड झालेल्या मिश्रणाचे पेढे वळायला  घ्या. सजावटीसाठी पिस्त्यांचे काप वापरू शकता. त्याचप्रमाणे गणपतीसाठी हेच मिश्रण मोदकांच्या साच्यात घालून तुम्ही याचे मोदक करू शकता.

**वाढणी प्रमाणः**

पेढ्यांच्या आकारावर अवलंबून आहे.

**विशेष टीपा:**

१. जर फक्त मलई पेढे करायचे असतील तर मँगो पल्प नाही घातला तरी चालेल.

२. मंद आचेवर सतत मिश्रण ढवळत राहणे हे या पाककृतीमध्ये अतिशय महत्त्वाचे आहे.

३. मिश्रण भांड्याला खाली लागता कामा नये. तसे झाले तर  चवीत फरक पडेलच पण मोदक/ पेढे दिसायलाही चांगले दिसणार नाहीत.

रेणू रानडे



## कणकेचे मोदक तळणीचे/उकडीचे

**साहित्यः**

**सारणाचे साहित्यः**

२ कप खवलेले नारळ

१.५ कप गूळ किसून

११ बदाम

११ काजू

४ वेलचींची पूड

४-५ चमचे तूप

**मोदकाच्या पारीसाठी साहित्यः**

२ कप गव्हाचे पीठ

चिमूटभर मीठ

५ चमचे तूप

पाणी

**कृती:**

**सारणः**

एका पातेल्यामध्ये तूप गरम करण्यास ठेवणे. तूप गरम झाल्यावर त्यात सगळा सुकामेवा घालावा. सुकामेवा थोडासा परतल्यानंतर एका दुसऱ्या भांड्यात काढून ठेवणे. त्यानंतर पातेल्यात गूळ गरम करण्यास ठेवणे. गूळ वितळल्यानंतर त्यात ओले खोवलेले नारळ घालूम परतत राहणे. मिश्रण कोरडे होईपर्यंत परतल्यानंतर स्टोव्ह बंद करून ते मिश्रण गार होऊ द्यावे. हे झाले सारण तयार.

**मोदकाची पारी तयार करणे:**

२ कप गव्हाचे पीठ, मीठ, तूप आणि लागेल तसे पाणी घालत कणीक मळणे. कणकेचे छोटे छोटे उंडे करून त्याच्या छोट्या पुऱ्या लाटून घ्याव्यात.

प्रत्येक पुरीमध्ये साधारण चमचाभर सारण भरून त्याला बोटाने कळ्या पाडत पाडत मोदकाचा आकार देत वळत राहणे. आता हे तयार झालेले मोदक तुम्ही तळू शकता किंवा वाफवून/उकडून घेऊ शकता.

जर मोदक वाफवायचे असतील तर, एका पातेल्यामध्ये गरम पाणी भरून घे. पातेले पूर्ण भरायचे नाही. अर्धेच भरायचे. पाण्याला चांगली उकळी आली की त्यावर एक चाळणी ठेवा. आता मोदक त्या चाळणीमध्ये ठेवून त्यावर झाकण ठेवा. १५ ते २० मिनिटांनंतर चांगले वाफवलेले मोदक ताटात काढून घ्या.

पानात वाढताना प्रत्येक मोदकावर चमचाभर तूप ओता म्हणजे मोदक आणखीनच चविष्ट लागतील.

**वाढणी प्रमाणः**

११ मध्यम आकाराचे मोदक





निलांबरी पोवार



## भरली राजेळी केळी

**साहित्यः**

३ केळी

१/४ चमचा तूप

४ टेबलस्पून ताजा किंवा फ्रोझन किसलेला ओला नारळ

२ टेबलस्पून किसलेला गूळ

२ चिमूट वेलचीची पूड

१ चिमूट जायफळाची पूड

१/२ कप नारळाचे दूध

**कृती:**

१. एका पॅनमध्ये १/४ टीस्पून तूप गरम करून घेणे. तूप वितळल्यानंतर त्यात ओला नारळ आणि गूळ घालून परतणे. गूळ वितळेपर्यंत परतत रहाणे. गूळ वितळल्यानंतर लगेच स्टोव्ह बंद करून पॅनमधील साहित्य एका दुसऱ्या भांड्यात काढून घेऊन थंड होऊ देणे. हे मिश्रण कोमट असतानाच त्यात वेलची पूड तसेच जायफळाची पूड घालणे. आणि चमच्याने नीट एकत्र करून घेणे.

२. केळी सोलून घेऊन त्याला मध्ये चीर द्यावी म्हणजे त्यात मिश्रण भरता येईल.

३. नारळ आणि गूळाचे थंड झालेले मिश्रण केळ्यांमध्ये भरून घ्यावे.

४. एक पसरट भांडे स्टोव्हवर ठेवून स्टोव्ह चालू करावा. एकाशेजारी एक अशी भरलेली केळी त्या भांड्यात काळजीपूर्वक ठेवावी. केळ्यांमधून बाहेर आलेले मिश्रण हळूवारपणे भांड्यातून चमच्याने काढून घ्यावे.

आणि केळ्यांच्या बाजूने नारळाचे दूध भांड्यात ओतावे. भांड्यावर झाकण ठेवून शिजायला ठेवावे. साधारण २ मिनिटांनी केळ्यांची बाजू उलटून पुन्हा २ मिनिटं शिजू द्यावे. केळी किंचीत ब्राऊन होऊन व्यवस्थित शिजू द्यावी.

**वाढणी प्रमाणः**

खाल त्याप्रमाणे :)

आपल्या आवडीप्रमाणे गरम किंवा गार कसेही वाढू शकता.

**विशेष टीपा:**

केळी घेताना थोडी कडक , मऊ नसलेली घ्यावीत. राजेळी केळी मिळाली तर उत्तमच!

हा एक पारंपरिक पदार्थ असून दरवर्षी हरितालेकच्या दिवशी माझी आजी आवर्जून ही राजेळी केळी करते.

अजिता निमकर

## गारेगार आईसक्रीम मोदक

कुठल्याही आवडीच्या चवीचे आईसक्रीम विकत आणा किंवा तुम्ही जर घरी तयार  केलेले असेल तर ते वापरले तरीही चालेल.  हे आईसक्रीम थोडे पातळ करून बीटरने चांगले मिक्स करून घ्या. आता हे बिट केलेले आईसक्रीम मोदकांच्या साच्यात भरून फ्रीझरमध्ये चांगले ३-४ तास ठेवा.

त्यानंतर मोदकाचा साचा हलक्या हाताने बाजूला करून मोदक काढून घ्या. असे हे थंडगार , गारेगार आईसक्रीम मोदक बाप्पाबरोबरच घरातल्या बालगणेशांना सुद्धा अगदी खूश करतील.

शिल्पा जैन




Marathi Mandal Sacramento
वक्रतुंड महाकाय
सूर्यकोटि समप्रभ
निर्विघ्नं कुरु मे देव
सर्वकार्येषु
सर्वदा
Date: Sunday, August 27th , 2017 @ 2:00 PM Onward
Venue: Laxmi Narayan Mandir Temple,
7495 Elder Creek Rd, Sacramento, CA 95824


WELCOME TO OUR NEW LOCATION!
www.FolsomFamilyDental.com • 1568 Creekside Dr. Suite 202, Folsom, CA 95630
PAWAR DENTAL
CORPORATION
YOUR ONE STOP SMILE SHOP!
Call Today for an Appointment!
(916) 235-6212
Benefits We Offer
✓ Dental Cleanings
✓ Low Radiation Digital X-Rays
✓ Sedation Dentistry
✓ Dental Crowns
✓ Teeth Whitening
✓ Oral Surgery
✓ Dental Fillings
✓ Orthodontics
✓ Implants and Bridges
✓ Dental Emergencies
✓ Most Insurance Accepted
✓ Caring and Helpful Office Staff

## शास्त्रोक्त अष्टविनायक दर्शन





अष्टविनायक गणपतींमधले सगळे गणपती हे स्वयंभु आणि जागृत आहेत.  म्हणूनच अष्टविनायक दर्शन ही मराठी माणसाची एक जिव्हाळ्याची गोष्ट. " आयुष्यात एकदा तरी अष्टविनायक दर्शन करायचं बाबा" असं खूप वेळा म्हटलं जातं. आपल्यासारखे भारतात शॉर्ट का होईना भेट देणाऱ्यांना तर ही गोष्ट अजूनच कठीण. त्यामुळे जी देवस्थाने जवळ असतील त्याप्रमाणे अष्टविनायकाची फेरी होते. पण तरीही 'शास्त्रोक्त ' अष्टविनायक दर्शनाची माहिती करून घ्यायला काय  हरकत आहे? चला तर मग!

**१. मयुरेश्वर - मोरगाव :** पुणे शहराच्या आग्नेय दिशेस


मोरगाव गणपती: अष्टविनायक यात्रेमध्ये प्रथम दर्शनाचा मान हा मयुरेश्वराचा आहे.

गणेश पुराणातील आख्यायिकेप्रमाणे 'सिंधु' राक्षसाचा वध करण्यासाठी मयुरेश्वराचा अवतार त्रेतायुगात झाला. मोरावर आरूढ होऊन त्याने सिंधुचा वध केला आणि त्यामुळे गणपतीचे मोरेश्वर हे नाव पडले. मोरगाव हे मोराच्या आकाराचे आहे. पूर्वी इथे खूप मोर असायचे. मूळ मूर्ती ही वाळू, लोखंड आणि हिऱ्यांची बनलेली आहे जी आत्ताच्या मूर्तीच्या मागे आहे. मोरया गोसावी यांनी श्री गणेशाची आराधना इथेच केली आणि त्यांना सिद्धी प्राप्त झाली.



२. **श्री सिद्धेश्वर गणपती - सिद्धटेक :** मोरगाव पासून साधारण दोन तासांच्या अंतरावर असलेले गाव.

मधू आणि कैटभ या राक्षसांनी सर्वत्र धुमाकूळ घातला होता. ते दोघे साधू संतांना फार त्रास देऊ लागले. त्यांचा वध करण्याचे काम शंकराने विष्णूवर सोपवले. घनघोर युद्धानंतर देखिल श्री विष्णूंना काही यश येईना. मग त्यांनी यश मिळावे म्हणून जिथे गणेशाची आराधना केली ती ही "सिद्धटेक" ची टेकडी. सिद्धटेक देऊळ श्री विष्णूंनी बांधलं होतं असं ऐकिवात आहे. आत्ताचे देऊळ हे नंतर अहिल्यादेवी होळकर यांनी बांधले आहे.



**३. श्री बल्लाळेश्वर गणपती -पाली : जिल्हा रायगड**

कल्याण शेटजीच्या मुलाचे नाव बल्लाळ. तो आणि त्याचे मित्र नेहमी पूजा पूजा खेळायचे. पूजा करताना ते एवढे मग्न व्हायचे की ते तहान भूक , दिवस रात्र सगळं विसरून जायचे. गावकऱ्यांनी मग कल्याण शेटकडे तक्रार केली की तुझा मुलगा आमच्या मुलांना बिघडवतोय. कल्याण शेटनी पूजा उध्वस्त केली आणि बल्लाळाला रात्रभर झाडाला बांधून ठेवले. अर्धवट  शुद्धीत असताना पण बल्लाळ जप करीत होता. पहाटे जेव्हा त्याला गणपतीने एका ब्राह्मणाच्या रुपात येऊन जेव्हा त्याला बंधमुक्त केले, तेव्हा बल्लाळाने हे प्रत्यक्ष गणपती आहेत हे लगेच ओळखले. तुम्ही इथेच रहा अशी प्रार्थना केली. गणपतीने एका शिळेमध्ये प्रवेश केला. बल्लाळेश्वर हे नाव धारण केले. आत्ताची जी बल्लाळेश्वराची मूर्ती आहे ती हीच!

ज्या शिळेची बल्लाळाने पूजा केली तिला धुंडी विनायक असे म्हणतात. बल्लाळेश्वराचे दर्शन घेण्यापूर्वी धुंडी विनायकाचे दर्शन घेण्याची प्रथा आहे.



**४. श्री वरद विनायक गणपती** - **महड** पाली पासून साधारणतः २ तासांच्या अंतरावर खोपोलीजवळ वसलेले गाव

वरद विनायकाची गृत्समद या ऋषींनी अर्चना केली आणि त्यांनीच देऊळसुद्धा बांधले. मूर्ती ही पूर्वाभिमुखी असून मूर्तीजवळ सतत तेलाचा दिवा असतो. वरद विनायकाच्या मूर्तीपर्यंत भक्तांना जाण्याची मुभा आहे.



**५. श्री चिंतामणी गणपती -थेऊर** -पुणे शहराच्या जवळ

कपिल ऋषीकडे जेव्हा राजपुत्र गुणा गेला होता तेव्हा "चिंतामणी" रत्नाच्या सहाय्याने कपिल ऋषींनी त्याला सुग्रास जेवण वाढले. चौकशी केल्यावर त्याला कपिल ऋषींनी सांगितले की चिंतामणी रत्नाने सर्व आकांक्षा पूर्ण होतात. राजपुत्राला वाटले एवढा अनमोल रत्न या ऋषींकडे कशासाठी? चिंतामणी हा मलाच मिळायला हवा. त्यानी तशी ऋषींना मागणी केली. या रत्नाचे सामर्थ्य जर चुकीच्या हातात पडले तर अनर्थ होऊ शकतो हे जाणून ऋषींनी ती मागणी नाकारली. राजकुमाराने ते रत्न बळजबरीने हिसकावून घेतले. अत्यंत व्यथित होऊन ऋषींनी गणपतीची प्रार्थना सुरू केली. गणपतीने ऋषींची व्यथा जाणून त्याना ते रत्न परत आणून दिले. परंतु त्यांनी ते रत्न गणपतीच्या गळ्यात घातले. म्हणून तेव्हापासून त्याचे नाव "चिंतामणी" पडले.



**६. श्री गिरिजात्मजा गणपती –लेण्याद्री**

सर्व अष्टविनायकांमध्ये फक्त लेण्याद्रीचा गिरिजात्मज हा फक्त डोंगरावर वसलेला आहे. गणेश हा माझा पुत्र व्हावा या ध्यासाने पार्वतीने १२वर्श इथल्या गुहांमध्ये कठोर तप केले. तेव्हा गणेशाने प्रसन्न होऊन तसे वचन तिला दिले. गणेश चतुर्थीला मग पार्वतीने मळापासून एक मूर्ती तयार केली जी तेव्हा जिवंत झाली. त्याचे नाव "गिरिजात्मज" सिंधू असुराचा वध हा गिरिजात्मजाच्या हातून होणार आहे हे सिंधूला माहित होते. त्याने खूप वेळा असुर पाठवून गिरिजात्मजाचा वध करण्याचा प्रयत्न केला. परंतु बाल गिरिजात्मजाने सर्व असुरांचा वध केला.




**७. श्री विघ्नेश्वर गणपती -ओझर**

राजा अभिनंदन याने मोठा यज्ञ केला. तो हे सर्व इंद्रपद  मिळवायला करत आहे असे इंद्राला वाटले. म्हणून त्याने विघ्नसूर नावाचा राक्षस तयार केला आणि त्याला आज्ञा दिली की तू त्या यज्ञात विघ्न आण जेणेकरून अभिनंदन राजाला इंद्रपद मिळणार नाही. विघ्नासुराने तो यज्ञ तर भंग केलाच पण पृथ्वीवरील सर्व यज्ञांमध्ये पण विघ्न आणले. सज्जनांना त्रास देऊ लागला. सर्व लोकांनी गणपतीची प्रार्थना केली. गणपतीचे आणि विघ्नासुराचे युद्ध झाले. विघ्नासूर गणपतीला शरण आला आणि त्याने माफी मागितली. गणपतीने "विघ्नेश्वर"

असे नाव धारण करावे अशी इच्छा व्यक्त केली. म्हणून गणपतीचे "विघ्नेश्वर' असे नाव प्रचलित झाले. तेव्हापासूनच विघ्न टाळण्यासाठी कुठल्याही शुभ कार्याची सुरूवात गणपती पुजनाने करण्याची प्रथा पडली आहे.



### ८. श्री महागणपती -रांजणगाव

गृत्समद ऋषीच्या शिंकेमधून एका पुत्राचा जन्म झाला. त्याचे नाव त्रिपुरासूर होते. वडीलांकडून गणेश मंत्राची दिक्षा घेऊन त्याने तप केले. त्याचे फळ म्हणून त्याला गणपती प्रसन्न झाला. माझा वध फक्त शंकराच्या हातून होऊ शकेल आणि त्यानंतर मला सद् गती मिळेल असा वर त्याने गणपतीकडून मागून घेतला. आपल्याला कोणी मारू शकत नाही याचा गर्व त्याला झाला. त्याने इंद्रलोक जिंकला. शंकराची स्तुती करून कैलास सुद्धा मागून घेतले. पृथ्वीवर त्याने सगळ्यांना सळो की पळो करून सोडले. सर्व देवांनी नारद मुनीकडे सहाय्य मागितले. नारद मुनींनी त्यांना ८ गणपती स्तोत्र शिकवली जी संकटनाशन स्तोत्रं म्हणून प्रसिद्ध आहेत. शंकराने जेव्हा संकटनाशन स्तोत्र म्हटले तेव्हा त्याना त्रिपुरासुराचा वध करता आला.



असे आठही गणपतींचे दर्शन झाले की मोरगावला परत मयुरेश्वराचे दर्शन घेतल्यानंतर अष्टविनायक दर्शन पूर्ण होते.

सोनाली भिसे



# आमच्या घरचा गणपती



**जान्हवी व सारंग कुलकर्णी**



**डिंपल व मंदार निमकर**



**सुजाता व अमर पवार**



**पूनम व उमेश जाधव**



**पल्लवी व आशिष धुमाळ**



अजिता निमकर व पुष्कर पुरोहित



**शुभांगी व मिलिंद कोन्नुर**



**माधुरी व आशुतोष शिरोळकर**

# आमचा गणपती- सॅक्रामेंटो स्टेट युनिव्हर्सिटी

२०१३ साल, अमेरिकेत आल्यानंतर साधारण दोन आठवडे होऊन गेले होते. आधीच पहिल्यांदा घरापासून , देशापासून लांब असल्याने होमसिकनेस खूप जाणवत होताच. त्यातून ते दिवस होते गणेशोत्सवाचे! भारतात सगळीकडे गणपतीच्या आगमनाची उत्सवाची जोरदार तयारी चालू होती. आणि त्यामुळे ती वर्णनं ऐकून इकडे आणखीच अस्वस्थता वाटू लागायची. गणपतीचा सण म्हणजे अगदी जिव्हाळयाचा सण! त्यामुळे मग जरा शोध घ्यायला सुरुवात केली की इथे युनिव्हर्सिटीमध्ये कुणी मराठी विद्यार्थी आहेत का आणि गणेशोत्सव साजरा केला जातो का? आणि लक्षात आलं की इथे युनिव्हर्सिटी मध्ये गणेशोत्सव साजरा होतच नाही. मग काय एक दिवस, मी आणि माझ्याबरोबर राहणारे माझे २ मराठी मित्र अथर्व पुराणिक व अजिंक्य ढोबळे , आम्ही ठरवलं आपण इथे गणेशोत्सव साजरा करायचाच!

विद्यार्थी आम्ही.. आमच्याकडे गाडी कुठून असणार? आणि भारतीय सामान मिळणारे दुकान मात्र बरेच लांब होते. पण बाप्पा आपल्याकडे आलेच पाहिजेत ही इच्छा मात्र जबरदस्त होती त्यामुळे तीन बस बदलून श्री गणेशाची मूर्ती व पूजेचे सामान घेऊन आलो. रात्रभर जागून बाप्पांसाठी सजावट केली. त्यानंतर पूजा कुणीतरी मोठ्याने करावी म्हणून आमचा सिनीयर रोहित आगाशेला यजमानपद देऊन गणपतीची यथासांग पूजा केली. श्री गणेशाची ५ दिवसांसाठी स्थापना केली. दररोज संध्याकाळी आरतीसाठी सर्व विद्यार्थी जमत असू आणि कुणीतरी एक जण रोज प्रसाद करून आणत असे. आमच्या या उत्सवाची वार्ता पसरायला वेळ लागणं शक्यच नव्हतं. आरतीसाठी संध्याकाळी साधारण पन्नासेक विद्यार्थी/विद्यार्थिनी जमू लागल्या. उत्सवाचा खर्च स्वखुशीने दिलेल्या अगदी$१ पासून ते $२० पर्यंतच्या देणगीतून करत असू.

आता गेल्या वर्षीचा उत्साह आणि अनुभव पाहून आम्ही पुढच्या वर्षी मात्र अगदी आधीपासून आखणी आणि तयारीला सुरुवात केली. आणि त्यावर्षी थोडा आणखी मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा झाला.

तिसऱ्या वर्षी मात्र प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाला. आता आमच्यापैकी काही जण इंटर्नशिपच्या माध्यमातून "कमावते" झाले होते. अर्थातच त्यामुळे देणगीतही वाढ झालीच. आणि त्यामुळे आम्ही त्यावर्षी सगळ्यांना महाप्रसादाचे जेवण देण्याचे ठरवले. त्याचप्रमाणे केवळ युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांसाठी मर्यादित

ठेवता आम्ही बाहेरच्या लोकांनादेखील दर्शनाला या असे आमंत्रण दिले. आमच्या या उत्सवाला काही अमेरिकन विद्यार्थ्यांनी सुद्धा अगदी आवर्जून हजेरी लावली. साधारणतः १८० च्या आसपास लोकांनी दर्शन घेतले.

यंदा आमचे हे गणेशोत्सवाचे ५ वे वर्ष आहे. आणखी एक सांगायचं म्हणजे साधारण ऑगस्ट मध्ये नवीन मुलांची बॅच आलेली असते आणि त्याच सुमारास गणेशोत्सवही असतो. त्यामुळे नवीन मुलांच्या एकमेकांशी ओळखी होऊन एकत्र काम करण्याची संधी त्यांना मिळते. एक प्रकारचे नेटवर्किंगच होतं म्हणा ना! आणि गणेशोत्सव सुरु करण्यामागे खरा उद्देश हाच तर होता ना लोकमान्य टिळकांचा देखील.

हा उत्सव असाच कायम चालू राहो अशी माझी इच्छा आहे. मराठी मंडळाने देखील गणेशोत्सवाच्या निमित्ताने नवीन विद्यार्थांचे स्वागत करून हा उत्सव चालू ठेवण्यास त्यांचाही हातभार लावावा अशी माझी मंडळाच्या कार्यकारिणीला विनंती आहे.

**गणपती बाप्पा मोरया| मंगलमूर्ती मोरया|**





कौस्तुभ उपाध्ये



**KIFS** Kotwal Insurance & Financial Services

***People don't plan to fail, They just fail to plan***

When it comes to happy retirement, key is to plan well.

**Dear Friend,**

**Just Half an Hour with Me Can HELP you:**

- Plan for your children's college education
- Generate a **tax free** income from retirement till age 100
- Roll over your orphan IRAs and 401 Ks into meaningful, secure investment for guaranteed retirement income.
- Select a right insurance policy to cover your **mortgage** fully in case of death
- Reevaluate your existing insurance policy free of cost and if necessary suggest a better policy that will give you life coverage and completely tax free retirement income

In short, help you with planning all aspects of your financial life. Please call

**Ray Kotwal, MBA Finance**

**Life Insurance and Planning Specialist**

**Insurance License No. OH12645**

Remember **KIFS** for all your financial needs

Kotwal Insurance & Financial Solutions

www.raykotwal.biz raykotwal@hotmail.com



## संतांची महती

## श्री समर्थ रामदास स्वामी



अश्वत्थामा बलिर्व्यासो  हनुमन्तो बिभीषण:

कृप: परशुराम: च सप्तहित: चिरंजीव:

असा एक श्लोक लहानपणी आम्हाला शिकवला होता. वरील श्लोकात सात जणांची नावे आहेत की जे चिरंजीव आहेत. त्यात एक नाव हनुमंत म्हणजे मारुतीचे आहे. १७  व्या शतकातील श्री समर्थ रामदास स्वामी हे श्री मारुती आणि श्री रामाचे निस्सीम उपासक आणि भक्त होते.  श्री मारुतीरायाच्या बाबतीत अशी एक आख्यायिका प्रसिद्ध आहे की, जेथे जेथे श्री राम चरित्राचे गायन वा  कथन चालले असेल तिथे तिथे श्री मारुतीराय गुप्त रूपाने ऐकायला येऊन बसतात. तसे एकदा श्री समर्थ रामदास स्वामी कीर्तन करीत

असतांना श्री मारूतीराय कुणालाही नकळत श्री राम चरित्र ऐकायला बसले होते. कथा सांगता सांगता सीतामाईला, लंकेचा राजा रावण ह्याने जबरदस्तीने पळवून नेऊन अशोकवनात, अक्राळ विक्राळ राक्षशिणींच्या पहाऱ्यात ठेवले होते, असा कथाभाग आला. श्रीमारुतीराय सीतामाईला शोधत शोधत अशोक वनात आले होते तो प्रसंग श्री रामदास स्वामी श्रोत्यांना सांगत होते. सांगता सांगता ते म्हणाले की अशोकवन तेंव्हा सुंदर सुंदर पांढऱ्या फुलांनी बहरले होते. त्या क्षणी श्री मारुतीराय आपण गुप्त वेशात आहोत हे विसरून एकदम उभे राहिले आणि म्हणाले की नाही! तेव्हा ती सर्व फुलं लाल रंगांची होती. कुणी नाही ओळखलं तरी श्री रामदास स्वामींनी मारुतीरायाला आधीच ओळखले होते. ते म्हणाले की नाही मारुतीराया! तुला समजले नाही, फुलं पांढऱ्या रंगांचीच होती. कीर्तन संपल्यावर सुद्धा मारुतीराय तेच तेच म्हणत होते. श्री समर्थ रामदास स्वामी ऐकत नाही असे पाहून ते म्हणाले की चला! आपण दोघे श्रीरामांनाच विचारू या. ती दोघेही श्रीरामाकडे गेली आणि त्यांना हनुमंताने विचारले, तेव्हा ते सीतापती श्रीराम म्हणाले की नाही हनुमंता! फुलं पांढरीच होती. मारुतीराय चिडून श्रीरामांना म्हणाले की तुम्ही काही तिथे नव्हता, तुम्हाला माहीत नाही. श्री हनुमान रामदास स्वामींना म्हणाले की चला आपण सीतामाईकडेच जाऊ आणि त्यांनाच विचारू, त्या म्हणतील ते खरे! त्यानंतर ती दोघे सीतामाईकडे गेली आणि तोच प्रश्न त्यांनी तिला विचारला तेव्हा ती भूमिकन्या सीतामाई म्हणाली की हनुमंता! फुले पांढरीच होती पण तुझ्या मनात लंकाधिपती रावणाविषयी इतका राग, इतका संताप होता, त्यामुळे तुझे डोळे इतके लाल लाल झाले होते की तुला ती सगळी फुलं पांढरी असुनसुद्धा लाल दिसत होती. तेव्हा कुठे जाऊन मारुतीला श्री समर्थ रामदास स्वामींचे म्हणणे पटले. असो. फार गोड कथा आहे म्हणून सांगितली.

श्री समर्थ रामदास स्वामींचा जन्म जालना जिल्ह्यातल्या जाम्ब ह्या गांवीं इ. स. १६०६ च्या चैत्र शुद्ध नवमीस मध्यान्ही म्हणजे रामनवमीस झाला. त्यांचे संपूर्ण नाव नारायण सूर्याजीपंत ठोसर असे होते. त्यांच्या आईचे नाव राणूबाई असे होते. त्यांच्या वडील भावाला श्रेष्ठ असे म्हणत. नारायण ८ वर्षांचे असतांना त्यांचे वडील वारले. त्यामुळे त्यांना लहान वयात मोठा धक्का बसला आणि त्यांना ईश्वर दर्शनाची ओढ़ लागली. आत्यंतिक तळमळीतून त्यांना लहान वयांत श्री रामाचे दर्शन झाले आणि श्रीरामांनी 'श्रीराम जयराम जयजयराम' असा तेरा अक्षरी मंत्राचा जप करावयास सांगितला. नंतर नाशिकजवळ टाकळी ह्या गावी १२ वर्षे वरील प्रमाणे जप केल्यावर त्यांना आत्मसाक्षत्कार झाला. ही साधना करताना त्यांना साक्षात श्री हनुमंताचे मार्गदर्शन मिळाले, हे विशेष. नंतर रामदास स्वामींनी २४ व्या वर्षांपासून ३६ व्या वर्षापर्यंत म्हणजे १२ वर्षे भारतभर भ्रमण केले आणि लोकसंग्रह केला. जागोजागी श्री रामाच्या मूर्तींची स्थापना करून मंदिरे बांधली.

चाफळला श्री रामाची स्थापना केली. पुणे सातारा कऱ्हाड रस्त्यावर उंब्रज गाव आहे तिथे उजवीकडे वळल्यावर चाफळ हे गाव लागते. तिथे आता सुंदर मंदिर आहे. रामनवमीस तेथे मोठा उत्सव असतो. तिथे रहायाची, जेवायाची पण सोय आहे.

श्री शिवाजी महाराजांना इ.स. १६४७ साली श्री रामदास स्वामींनी अनुग्रह दिला. पुढे ६ वर्षांनी राजांनी आपली सनद भिक्षा म्हणून समर्थांच्या झोळीत टाकली. श्री समर्थानी ती तशीच परत केली आणि आपली खूण म्हणून राज्याचा ध्वज भगवा करण्यास सांगितले. समर्थ रामदासांनी ११ मारुतींची जागोजाग स्थापना करून ११ मठ स्थापिले व प्रत्येक ठिकाणी महंतांची नेमणूक केली. श्री समर्थ रामदास स्वामींनी प्रायोपवेशन करून माघ वद्य नवमीस, इ.स. १६८१ मधे सज्जनगडावर महासमाधी घेतली.

समर्थ रामदास स्वामींनी २० दशकांचा दासबोध हा ग्रंथ लिहिला. प्रत्येक दशकात १०-१० समास असून त्यात साडे तीन चरणांची ओवीबद्ध रचना आहे. दररोज वाचनासाठी त्यांनी "मनाचे श्लोक " लिहिले. ह्याशिवाय त्यांनी करुणाष्टके, रामायणातील सुंदरकांड, युद्धकांड, सगुणध्यान, निर्गुणध्यान असे लहान मोठे खूप ग्रंथ लिहिले. मानवदेहाचे मोठे महत्व असल्याचे सांगून त्या शिवाय आत्मसाक्षात्कार नाही. मला देव हवा असे मनापासून वाटणे हेच शुद्ध भक्तीचे मूळ आहे. विवेकातून भक्ती, त्यातून विरक्ती व अनासक्ती आणि ईश्वराच्या सहवासाची अनावर ओढ़, हे स्वामींच्या शिकवणुकीचे मर्म आहे. त्या दृष्टीने दासबोधातील ४ थे दशक नवविधा भक्ती, १२ वे, १३ वे, आणि १४ वे दशक अनुक्रमे वैराग्य, नामरूप व अहर्निश ध्यान हे असून त्याचा अभ्यास सर्वानी जरूर करावा. त्याची पुढची पायरी म्हणजे,

श्री ज्ञानेश्वर माउलीच्या शब्दात सांगायचे झाले तर,

मी, माझेपण; विसरले जयाचे अंत:करण

तोचि संन्यासी जाण, निरंतर!

देहूचे संत श्री तुकाराम महाराज म्हणतात,

सारासार विचार करा, उठा उठी , नाम धरा कंठी विठोबाचे

तयाच्या चिंतनी, निरसेल संकट, तराल दुर्घट भवसिंधु

जन्मोनिया कुळी, वाचे स्मरा राम, धरी हाचि नेम अहर्निशी

तुका म्हणे कुळे ती पुनीत, भावे गाता गीत विठोबाचे

श्री ज्ञानेश्वर माउली ज्ञानमार्गी म्हणून त्यांनी संन्यास व संन्यासी, कशाला व कुणाला म्हणावे ह्याची व्याख्या एका ओवीत केली. श्री तुकाराम महाराज भक्तिमार्गी म्हणून त्यांनी सतत (कंठी म्हणजे -अजपा) जप केला असता परमेश्वर प्राप्ती कशी होते हे वरील अभंगात सांगितले.

माणसाला अनुताप झाला तर तो बद्धाचा मुमुक्षु होतो- म्हणजेच त्याला परमेश्वराची ओढ़ लागते. संतांकडून परमार्थ; श्रवण, मनन, चिंतन केल्यावर श्री सदगुरूंची भेट आणि अंती मोक्ष अशी श्री समर्थ रामदास स्वामींची शिकवण आहे. एकदा नदी सागराला मिळाली की जसे नदीचे वेगळेपण बाजूला काढता येत नाही तसे परमेश्वराशी एकरूप झालेला सिद्ध कधीच विभक्त होत नाही.

शुभं भवतु!

श्री. कुमार कुलकर्णी



Reliance
SuperMart
Indian & International Groceries


California IVF
Fertility Center
530-771-0177
www.CaliforniaIVF.com
Laurie Lovely, MD
Ernest Zeringue, MD
Pravin Goud, MD, PhD
Offices in Roseville and Davis



**Maharaja Shivaji – Building of a kingdom and preparing to be king of kings - between age 16 until his visit to Aurangzeb.**

*Young friends, last time I described Shivaji's childhood until his oath for freedom at a tender age of 16. In this edition, we will read about Shivaji's actual battles (and there were so many) and how he courageously, shrewdly, boldly and successfully overcame all the challenges. It is something you must read to get inspired with. Please read entire article below; ask questions to me or your parents. I am sure at the end, you will also be proud of Shivaji like everyone else in Maharashtra for last 300 years. Let us continue from where we left off.*

Maharaja Shivaji knew that "He who has control of fort, has control of territory" and he decided to capture the Torna fort. Shivaji and his friends planned and attacked Torna in late night hours. Even before Adilshahi forces on Torna could realize that the fort has been attacked, Shivaji had captured it.(1646) Shivaji was just 16!

After Torna, many other forts were captured by Shivaji which is just amazing considering the total amount of army he maintained and so few war resources he had at the time:

Rajgad fort, Chakan fort, Kondhana fort. Purandar fort

In 1648, Shivaji's early attempts were challenged by arrest of Shahaji by Bijapuri officer. The enemy of your enemy is your friend; by following this rule, Shivaji proved his mettle as an able politician and strategist and used his friendship with the Badshah of Delhi to pressurize Adilshah to secure his father's release.

Shivaji was very shrewd and visionary. He recognized the real strength of kings at that time depended on how protective the forts (killaa) are. Hence, in addition to winning above forts, Shivaji later constructed Raigad on Rairi, the second capital of Swarajya which witnessed coronation of Shivaji.Shivaji built one more fort "Pratapgad" in the center of Javli. Pratapgad is a result of great vision and stratagem of Shivaji. Later Shivaji selected this fort for tackling Afzalkhan. The possession of Supa, Baramati and Indapur rounded off the southeastern corner of the Puna district, while the acquisition of Purandar, Rajgad, Kondana and Torna secured Shivaji's territory by a strong chain of hill-forts on the south. Other forts he gained include: Rohida, Tikona, Lohgarh, Rajmachi.

Combat with Afzal Khan at Pratapgad is an amazing and very inspirational situation and how Shivaji handled the might of Afzal khan is a true sign of Shivaji's acumen, know the strength and weakness of opponent and then plan a strategy for a successful overpowering of a strong opponent. Shivaji was not afraid to follow unusual method of killing Afzal Khan with tiger's nails hidden in his fingers. Every Marathi person is proud of this story. It goes like:

In 1659, Adilshah sent Afzal Khan, an experienced and veteran general to destroy Shivaji in an effort to put down what he saw as a regional revolt. Afzal Khan desecrated Hindu temples at Tuljapur and Pandharpur, hoping to draw Shivaji to the plains where the

superior Bijapuri army could destroy him. Shivaji, however, sent a letter to Afzal Khan requesting a meeting to negotiate and pretending that he was afraid of the mighty general and his army and so they meet at Pratapgad foothills.

The two met in a hut at the foothills of Pratapgad fort on 10 November 1659. The arrangements had dictated that each come armed only with a sword, and attended by a follower. Shivaji had planned everything promptly and told his Mavles (his soldiers) that 'If something goes wrong and even if I die in the event, the fight of Swarajya must go on...'. Shivaji, as a protection, wore armour beneath his clothes, concealed a bagh nakh (metal "tiger claw") on his left arm, and had a dagger in his right hand. As predicted by Shivaji, the meeting turned to be a fight.

In the fight, Afzal Khan's dagger was stopped by Shivaji's armour, and Shivaji's weapons inflicted mortal wounds on the general. Shivaji then signalled his hidden troops to launch the assault on the Bijapuris who were waiting for the signal.

After the successful defeat of Afzal Khan, Shivaji turned his attention to another strong adversary, Bijapur's Abyssinian general Rustamjaman. Shivaji literally was fighting with 4-5 kingdom of Moghuls at one time and it is a tribute to his greatness how he was able to be successful. With a cavalry force of 5000 Marathas, Shivaji attacked them near Kolhapur on 28 December 1659. In a swift movement, Shivaji led a full frontal attack at the center of the enemy forces while two other portions of his cavalry attacked the flanks.This battle lasted for several hours and at the end Bijapuri forces were soundly defeated and Rustamjaman fled the battlefield.

Later in 1660, Shivaji was in another trouble when Siddi Jauhar's army besieged Panhala fort, cutting off supply routes to the fort in which Shivaji was stationed. There was nowhere to go but surrender. But then Shivaji did something which now has become a folklore told from generations to generations. That story is such a great impact on

Marathi person that even today Marathi person's face brightens just remembering it. The rainy season had started and Shivaji decided to leave the fort in a rainy night of 13th July. The plan was devised. He took 600 brave men with him. The group was led by Bajiprabhu Dehspande. Two Palkhi's were arranged: one for Shivaji, another for Shiva Nhavi (the barber who looked like Shivaji). The Palkhi taking Shiva Nhavi left the fort and distracted the enemy.

The enemy started chasing the palkhi with fake Shivaji and after some distance the Palkhi was caught. During this time Shivaji and his 600 men escaped from the siege. Everybody in the enemy was happy until they realized that the man they caught is not Shivaji. The enemy was now in search of real Shivaji. This is where the Famous Battle of Pavan Khind and BajiPrabhu Deshpande became household name. n the ensuing Battle of Pavan Khind, the smaller Maratha force, dual-wielding dand patta swords, held back the larger enemy for seven hours to buy time for Shivaji to escape.The battle resulted in the death of 300 Marathas and 3,000 Adilshahi troops. Baji's bravery saved Shivaji. The pass of Gajapur, which he held for saving Shivaji became sacred place for Marathas by blood of a great patriot and his 300 followers, hence it was further named as Pavan Khind ('Pavan' means sacred and 'Khind' means Pass).

Another battle from Delhi kingdom was awaiting Shivaji. Upon the request of Badi Begum of Bijapur, Aurangzeb sent his maternal uncle Shaista Khan, with an army numbering over 150,000 along with a powerful artillery division in January 1660 to attack Shivaji.

Now comes a masterly blow of Shivaji at Mughal Subhedar Shaista Khan.The attack on him right into to the middle of his camp. The planning and execution of this attack was so well that it created belief in Mughals that Shivaji possesses some kind of magical powers. In April 1663, Shivaji launched a surprise attack on Shaista Khan in Pune. Shivaji and band of some 200 followers infiltrated Pune, using a wedding procession as cover.

They overcame the palace guards, breached the wall, and entered Shaista Khan's quarters. My friends, Shivaji was on the forefront. It shows he was not afraid to be in battlefield and lead by example. Shivaji surprised and wounded the Mughal Subhedar of the Deccan in the heart of his camp, in his very bed-chamber, within the inner ring of his body-guards and servants. Shivaji attacked him and severed his three fingers with his sword. Shivaji and his people escaped the area very gracefully by disguising their enemy.

This attack of Shivaji, the Marathi hero were rewarded by an immense increase of his prestige. The whole country talked with astonishment and terror of the almost superhuman deed done by him.

*In the next edition, we will discuss Shivaji's visit to Delhi with his toddler son Sambhaji, how he was imprisoned by Aurangzeb and how daringly Shivaji escaped using an amazing tactic which has no parallel in world history. Read above story many times to be inspired how Shivaji could courageously tackled might of Moghuls from all sides with small army in comparison. But that is why my young friends, Shivaji is unique and not just Marathi people but all Indians should be proud of this unique king of kings.*

Ajit Natu



ajitnatu@gmail.com

916-716-5626

# मराठी मंडळ सॅक्रामेंटो मराठी शाळा वृत्तांत

नमस्कार मंडळी,

आपल्या मंडळाच्या मराठी शाळेच्या नवीन शैक्षणिक वर्षाला लवकरच सुरुवात होणार आहे. काही आठवड्यांपूर्वी आम्ही नवीन सत्रासाठी नोंदणी करण्याबद्दल सर्वांना ई-मेल पाठवली होती. ज्या पालकांनी आपल्या मुलांची नोंदणी वेळेत पूर्ण केली त्यांना मनापासून धन्यवाद ! वर्षागणिक मराठी शाळेतील मुलांच्या संख्येत वाढ होत आहे ही  निश्चितच आनंदाची बाब आहे पण त्याहूनही आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांची होणारी मराठी भाषेतील प्रगती. एकीकडे जिथे महाराष्ट्रात मराठी शाळा ओस पडू लागल्या आहेत तिथे बाराहजार मैलांवर दूर असणाऱ्या अमेरिकेत पालक मुलांना मराठी शाळेत पाठवायला आग्रही आहेत आणि ती मुलंही मोठ्या आवडीने मराठी शिकताहेत ही निश्चितच कौतुकाची गोष्ट आहे.




(फोटो : मराठी शाळेच्या वार्षिक परीक्षा सुरु असतांनाचा एक क्षण)

नुकत्याच संपलेल्या २०१६-१७ ह्या शैक्षणिक वर्षात आपल्या मराठी शाळेतून २८ विद्यार्थांनी बृहनमहाराष्ट्र मंडळातर्फे घेण्यात येणारी वार्षिक परीक्षा दिली आणि हे सर्व विद्यार्थी उत्तम गुणांनी यशस्वी झालेत. त्यांच्या ह्या यशाबद्दल त्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि मराठी शाळेतील सर्व शिक्षकांचे अभिनंदन. ह्या वर्षी काही मुलांनी पहिल्यांदाच चौथीची परीक्षा दिली. सर्वात जास्त म्हणजे १४ विद्यार्थांनी यंदा पहिलीची परीक्षा दिली. परीक्षा आणि निकालाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर BMM (बृहन महाराष्ट्र मंडळ) तर्फे सर्व मंडळातील शाळा संचालकांची बैठक घेण्यात आली आणि परीक्षेतील प्रश्नपत्रिकांवर सर्वांकडून अभिप्राय घेण्यात आला. काही सूचना ह्या निश्चितच चांगल्या स्वरूपाच्या होत्या आणि पुढील वर्षी प्रश्नपत्रिका तयार करतांना त्यांचा नक्की विचार होईल अशी आशा करण्यास हरकत नाही. तुम्हांला सुद्धा प्रश्नपत्रिकेसंबंधी काही सूचना असतील तर त्या आम्हाला जरूर कळवा; आम्ही त्या BMM पर्यंत नक्की पोहोचवू.

मंडळी, अमिता खरे ह्या गेली ४ वर्ष मराठी शाळेच्या सह-संचालिका म्हणून काम करत होत्या. मात्र यंदाच्या सत्रापासून त्यांनी काही काळासाठी शाळेच्या कामातून विश्रांती घेण्याचे ठरविले आहे. अमिता ह्या फॉल्सम शाखेचा कारभार पूर्णपणे सांभाळीत होत्या. त्यांनी आणि पल्लवी सावंत ह्यांनी एकत्रितपणे उत्तम काम करीत मंडळाच्या मराठी शाळेला एका नवीन उंचीवर नेऊन ठेवलं आहे यात शंकाच नाही. या दोघींमधील असण्याऱ्या समन्वयामुळेच शाळेच्या परीक्षा, सहल आणि वार्षिकदिन ह्या सारखे कार्यक्रम सुद्धा उत्तमरीत्या पार पडत आले आहेत. मराठी शाळेचं वाचनालय सुरु करण्यासाठी अमिता ह्यांनी त्यांच्या ठेवणीतील मराठी पुस्तके शाळेला भेट म्हणून दिली त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. अमिता ह्यांना मराठी शाळेबद्दल असणारी आस्था आपणा सर्वांना माहित आहेच त्यामुळे शाळेच्या पुढील वाटचालीसाठी सुद्धा आम्ही हक्काने त्याचं मार्गदर्शन घेत राहू. अमिता ह्यांच्या योगदानाबद्दल त्यांचे मराठी शाळेतर्फे मन:पूर्वक आभार. मंडळी, अमिता ह्यांच्या जागी आता विक्रम बोबडे हे मराठी शाळेचं काम पल्लवी सावंत ह्याच्या बरोबर सुरु ठेवणार आहेत. विक्रम मुख्यतः फॉल्सम शाखेचे  काम बघतील. त्यांना मराठी मंडळाच्या कार्यकारिणीवर काम करण्याचा अनुभव तर आहेच पण त्यांच्या कुटुंबाचा शैक्षणिक क्षेत्राशी फार जवळचा संबंध आहे. विक्रम ह्यांचे आजोबा हे शिक्षक, मख्याधापक आणि नागपूर जिल्ह्याचे शैक्षणिक पर्यवेक्षक होते. त्यांनी नागपुरातील एका हिंदी भाषिक शाळेत मराठी विभाग सुरु केला आणि आज त्या शाळेत शेकडो मुलं मराठी शिकत आहेत. तसंच विक्रम ह्यांचे वडील आणि आत्या हे दोघेही

मराठीचे शिक्षक होते. त्यामुळे विक्रम ह्यांना सुद्धा मराठी भाषेबद्दल आणि मराठी शाळेबद्दल विशेष आस्था आहे. त्यांच्यावरील ह्या नवीन जबाबदारीबद्दल  त्यांचे अभिनंदन!

धन्यवाद

पल्लवी सावंत




विक्रम बोबडे



(mmsac.shala@gmail.com)

# आगामी कार्यक्रमांची सूची



# मागील कार्यक्रमांची प्रकाशचित्रे तुम्हाला खालील दुव्यांवर पाहता येतील:

## रंगपंचमी

फोटो सौजन्य : आनंद सुर्वे

https://goo.gl/photos/YZAXz9qCW5KpXjNb8

फोटो सौजन्य : केतन चौधरी

https://goo.gl/photos/VRm25CgZeCdjZPM16

## नाटक - "तीन पायांची शर्यत"

फोटो सौजन्य : राजेश परब

https://photos.google.com/album/AF1QipNV9P0mYT0O2mPlaFwHVU0nO_khFYv0ZpP69dsa

https://photos.google.com/album/AF1QipNZ1IHQ19_T06MbcG30ZXJRuHaVhKTwT_cV8066

फोटो सौजन्य: विक्रांत सावंत

https://photos.google.com/album/AF1QipO2LvrweeD9H-sjshuNrdK4Ayo5ZcEme7wC1WfQ

## 'माझे जगणे होते गाणे' -डॉ. सलील कुलकर्णी

फोटो सौजन्य : आनंद सुर्वे

https://goo.gl/photos/aNbZuE9tKoQBNEYc7

फोटो सौजन्य :  केतन चौधरी

https://goo.gl/photos/kTqhB4XsLHgsBy9t8

फोटो सौजन्य: शशांक देशपांडे

https://goo.gl/photos/KqnRFKujCFEQDq6DA

## पिकनिक

फोटो सौजन्य : आनंद सुर्वे

https://goo.gl/photos/UXmgqoWCsjmvgztp7

# कँपिंग

फोटो सौजन्य : प्राची जेजुरीकर






|| मराठी मंडळ सॅक्रामेंटो ||

Marathi Mandal Sacramento (MMSac), Sacramento, CA, USA (Established 2005)

## Visit us at

## www.mmsac.org

Like us on Facebook

## Contact us at

## Committee@mmsac.org